# सिंचन क्षेत्रात पाणीवापर संस्थांची गरज

**प्रा. डॉ. प्रदिप विठ्ठलराव ताकतोडे**

मु. सारंगपूर, पो. चिंचोली (बोरे)

ता. मेहकर, जि. बुलढाणा - 443301

पाणी म्हणजे जीवन असे म्हटले जाते. अन्न, वस्त्र, निवारा ह्या मानवाच्या मुलभूत गरजा मानल्या जात होत्या. पण आता पाणी, अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मुलभूत गरजा आहेत असे मानावे लागणार आहे. पाणी समृद्धी, सुख आणि शांतीचे प्रतिक आहे. अनेक संस्कृतींचा विकास पाण्याच्या माध्यमातूनच आणि पाण्याच्या सहाय्यानेच झाला आहे. पाणी ही सर्वात मौल्यवान नैसर्गिक संपत्ती आहे. नदी, नाले, तलाव हे पाण्याचे मुळचे स्रोत. पाण्याच्या आधारे मानवाने प्रगती केली. या प्रगतीतूनच त्याने उपलब्ध पाण्याचा वापर कसा करावा? याचे नियोजन केले. यासाठी त्याने धरणे, तलाव, बांध, कालवे बांधले. पण वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा आणि कमतरता यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. यातूनच वाद, तणाव, संघर्ष निर्माण होऊ लागले. हे संघर्ष केवळ दोन व्यक्ती किंवा दोन समुहापर्यंत मर्यादित राहिले नाही तर दोन गावे, दोन जिल्हे, दोन राज्ये, दोन देश यांच्यापर्यंत पोहोचले. समृद्धी आणणारे पाणीच संघर्षाला कारण ठरू लागले. काही अभ्यासकांच्या मते तर पाण्यामुळे तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचे संचय, नियोजन आणि संवर्धन या बाबी फ्गार महत्त्वाच्या झाल्या आहेत. शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योग यांच्यासाठी वापर केला जाऊन माणसाचे जीवन सुखी व्हावे हा सिंचनाचा मुख्य उद्देश आहे. भारतातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. देशाच्या ज्या भागात हमखास सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत त्या भागात समृद्धी आहे. यासाठीच धरणांचे महत्व आहे. देशातील पहिले पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी धरणे ही आधुनिक भारताची मंदिरे असल्याचे म्हटले होते. त्यांना देशाला सशक्त

करण्यासाठी शेतीच्या विकासातच खरी ताकत आहे हे माहित होते. त्यामुळे त्यांनी शेती आणि सिंचनाला प्राधान्य दिले. मोठ्या बहुउद्देशिय सिंचन प्रकल्पांची पायाभरणी केली.

देशाच्या वाढत्या लोकसंख्येबरोबरच पाण्याची टंचाई भविष्यात वाढत जाणार आहे. लोकसंख्येची वाढ, वेगवान आर्थिक विकासाची गरज, अन्नधान्याची वाढीव गरज व ती पूर्ण करण्यासाठी सिंचन क्षेत्राचा व्यापक विस्तार, औद्योगिक विकास या सर्व गोष्टींमुळे भविष्यात जलसंपत्तीच्या विकासावर आणि वापरावर मोठ्या प्रमाणात बंधने येणार आहेत. पाणी हे कृषी व्यवसायाचा प्राण आहे. म्हणून पाणी पुरवठ्याच्या सर्व सोयींना शेतीच्या रक्तवाहिन्या आहेत असे म्हटले जाते. जगातील प्रत्येक सजीव प्राणी हा पाणी या घटकाशी निगडित आहे. पाण्याचा समतोल हा दिवसेंदिवस ढासळू लागला आहे. हा ढासळू लागलेला समतोल जर वेळीच सावरला नाही तर या स्रोताचा भविष्यात गरजा भागविण्याच्या क्षमतेवर आघात होईल. ह्या सर्व बाबींचा विचार करता पाणीवापर संस्था ह्या फार आवश्यक आहेत.

1978 साली भारत देशाने राष्ट्रीय जलधोरण-जलनिती (नॅशनल वॉटल पौलिसी) ठरविली. या धोरणामध्ये शेतकर्यांचा  सहभाग हा पाणी वितरण व पाणीपट्टी वसूली यामध्ये हळूहळू वाढवावा असे नमूद केले आहे. त्यानंतर 2002 साली आपण नवीन राष्ट्रीय शेतकर्यांचाच  नव्हे तर सर्व हितभागी व्यक्तींचा सहभाग हा जलक्षेत्रामध्ये विविध प्रकल्पांच्या संकलन, बांधकाम, परिचालन, देखभाल, दुरुस्ती, प्रत्यक्ष पाणी व्यवस्थापन व अन्य अनुषंगिक बाबीमध्ये अगदी सुरुवातीपासून असावा असे नमूद केलेले आहे. थोडक्यात म्हणजे लोकेच्छा, लोकसहभाग, लोकसहकार्य, लोकवर्गणी या चतुसुत्रीवर आधारित सर्व विकासकामे व्हावी. 2002 सालच्या राष्ट्रीय जलनिती मध्ये असेही ठरले की, प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यातील स्थिती लक्षात घेवून आपापले जलधोरण ठरवावे. यानुसार तसेच महाराष्ट्र जल व सिंचन आयोग 1999 मधील शिफारशी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने व त्यांच्या पाणीवापर संस्थांच्या मार्फत जलव्यवस्थापन व्हावे असे नमूद केलेले आहे. तसेच याबाबतीत आवश्यक

कायदे व त्याअंतर्गत नियम पारीत करून द्यावेत व या सर्व उपक्रमाला स्थायी व कायदेशीर स्वरूप प्राप्त करून द्यावे असेही धोरण म्हणून ठरले. यानुसार **महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकर्याकडून व्यवस्थापन अधिनियम 2005 व नियम 2006** हे मान्य झालेत व त्यानुसार महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पाबरोबर नव्या कायद्याच्या तरतूदीप्रमाणे पाणी वापर संस्था स्थापन करून त्यांच्या मार्ङ्गत पाणी व्यवस्थापन करण्यास सुरुवात झाली आहे.